# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०१/११/२०२४ (शुक्रवार) सकाळ


### पोलीस ठाणे काटोल हद्दीतील मेंढेपठार परिसरात अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या इसमावर कायदेशिर कार्यवाही

आगामी विधानसभा निवडणुक या अनुषंगाने कोणतेही अनुचित प्रकार घडु नये या करीता सुरक्षेतेच्या दृष्टीकोणातून मा. पोलीस अधिक्षक साहेब नागपुर जिल्हा नागपुर ग्रामिण याचे आदेशाने दि. ३१/१०/२०२४ रोजी पोलीस ठाणे काटोल हद्दीतील मेंढेपठार परिसरात मोहाफुल गावठी दारू काढणारे इसमावर कार्यवाही करण्यात आली. अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणारी महिला आरोपी ही मोहाफुल रसायन सडवा बाळगुन मोहाफुलाची गावठी दारूची रनिंग भट्टी काढतांना मिळुन आली. महिला आरोपीचे ताब्यातून १) ०५ निळया प्लॉस्टिक ड्रम ज्याचे आत प्रत्येकी २०० लिटर मोहाफुल रसायण सडवा असा एकुण १००० लिटर प्रति लिटर ३५ रू प्रमाणे कि. ३५००० रू २) एका प्लॉस्टिक डबकी मध्ये एकुण १५ लिटर मोहाफुल गावठी दारू प्रति १०० रू लिटर प्रमाणे असा एकुण १५००/—रू. ३) निळया रंगाचे ५ खाली ड्रम प्रत्येकी ५०० रू प्रमाणे २५०० रू असा एकुण ३९०००/— रू चा मुद्देमाल मिळून आल्याने मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. महिला आरोपी विरुद्ध कलम ६५(फ, ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर